# जिल्हा परिषद ठाणे आरोग्य विभाग

कार्यालयाचा पत्ता – अल्पबचत भवन, कन्या शाळा आवार, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) ४००६०१
दूरध्वनी क्रमांक – ०२२-२५३८३२८३ ईमेल आयडी - thanedhozp@gmail.com

जा.क्र./जिप/आंदिवासी/सं-८/ ५५५/२२
दिनांक – ०८/०८/२०२२

प्रति,
वैदयकिय अधिकारी
प्राथमिक आरोग्य केंद्र......(सर्व).

**विषय :- आश्रमशाळांना नियमित भेटी देणेबाबत.**

**संदर्भ :-** १. आरोग्य सेवा संचालनालय, पुणे कार्यालय पत्र क्र. संआसे/किनिना/कक्ष-५८/आश्रमशाळा भेटी/१२३७८-८२२/२०२२, दि. ५ ऑगस्ट २०२२.
२. राज्यातील सध्याची साथरोग परिस्थिती आणि आश्रमशाळा तपासणीबाबत वेळोवेळी देण्यात आलेल्या सुचना.

वरील विषयांन्वये जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात कोविड – 19, इन्फ्ल्यूएंझा ए एच १ एन १ व साथीचे आजाराचे रुग्णांमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येत आहेत. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आश्रमशाळातील मुलामुलींच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याबाबत संदर्भ क्र. २ अन्वये वरिष्ठ पातळीवर सर्व जिल्हयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

संदर्भ क्र. १ अन्वये आश्रमशाळा भेटीबाबत मार्गदर्शन सुचना परिपत्रक सोबत जोडलेले असून कार्यक्षेत्रातील आश्रमशाळेतील मुलामुलींच्या आरोग्याची विशेष काळजी, नियमित पाणी गुणवत्ता सनियंत्रण आणि किटकशास्त्रीय सर्वेक्षण याबाबत वैद्यकिय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य सेवक यांच्या सप्टेंबर २०२२ पर्यंतचा दैनंदिन भेटींचा कृती आराखडा करुन, आश्रमशाळा भेटीत सोबत जोडलेल्या पत्रात नमूद बाबी प्रामुख्याने पहाव्यात. आश्रमशाळा दैनंदिन भेटीत केलेल्या कार्यवाहिचा साप्ताहिक अहवाल सोबत जोडलेल्या नमुण्यात तालुका कार्यालयास दर सोमवारी सकाळी १०:०० वाजेपर्यंत पाठवावा. अहवाल पाठवितांना वेळेचे बंधन पाळावे.

**सोबत :- १. मार्गदर्शक सुचना.**
**२. साप्ताहिक अहवाल नमुना.**

for जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव**
गटविकास अधिकारी, पंचायत समिती,......(सर्व).
तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती,......(सर्व).
**२/- तालुक्याचा एकत्रित अहवाल दर सोमवारी सकाळी ११:०० वाजेपर्यंत पाठवावा.**

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
१. मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
२. मा. संचालक, आरोग्य सेवा, पुणे.
३. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे.
४. मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| | **महाराष्ट्र शासन**<br>आरोग्य सेवा संचालनालय, पुणे कार्यालय | NHM<br>राष्ट्रीय आरोग्य अभियान<br>महाराष्ट्र |
| संचालक<br>दूरध्वनी क्रमांक<br>कार्यालय दूरध्वनी क्र. | २६१२२२५६ (वै.)<br>२६१२२५०८ (का)<br>२६११९५७८ (का) | नवीन मध्यवर्ती इमारत, पहिला मजला,<br>पुणे ४११ ००१ (महाराष्ट्र राज्य) भारत<br>Email ID : dhspune1@gmail.com<br>website : arogya.maharashtra.gov.in |
| आरोग्य सेवा | जा.क्र. संआसे/करोना/कक्ष-५८/आश्रमशाळा भेटी/१२३७८-१२४२२/२०२२<br>दिनांक : ७ ऑगस्ट २०२२ | |


प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद , ……. ( सर्व)

जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, ……. (सर्व)

**विषय** – आश्रमशाळांना नियमित भेटी देणेबाबत –

**संदर्भ** – राज्यातील सध्याची साथरोग परिस्थिती आणि आश्रमशाळा तपासणीबाबत वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार, सध्या राज्यात कोविड -१९, स्वाईन फ्ल्यू, डेंग्यू अशा आजारांचे रुग्ण वाढताना दिसत आहेत. राज्यातील काही भागात जलजन्य आजाराचे उद्रेक झालेले आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील आश्रमशाळातील मुलामुलींच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या दृष्टीने पुढील सूचना निर्गमित करण्यात येत आहेत –

१) आश्रमशाळा तपासणी पथके आणि आर बी एस के तपासणी पथके यांच्या समन्वयाने आश्रमशाळा तपासणी काटेकोरपणे करण्यात यावी. या पथकांनी ज्या आश्रमशाळा आरोग्य संस्थापासून दूर आहेत अशा आश्रमशाळांना प्राधान्याने भेट द्यावी.

२) **आश्रमशाळा वाटप** - आपल्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांचे वाटप वैद्यकीय अधिकारी आणि समुदाय आरोग्य अधिकारी ( सीएचओ) यांचेमध्ये करण्यात यावे. या आश्रमशाळांना भेटी देण्याचा सप्टेंबर २०२२ पर्यंतचा दैनंदिन कृतीकार्यक्रम आखण्यात यावा.

३) **नियमित पाणी गुणवत्ता आणि कीटकशास्त्रीय सर्वेक्षण** - प्रत्येक आश्रमशाळेतील पाणी गुणवत्ता आणि कीटकशास्त्रीय सर्वेक्षणासाठी प्रत्येक आश्रमशाळासाठी आरोग्य सेवकांची नेमणूक करण्यात यावी. तेथील पाणी गुणवत्ता सर्वेक्षण आणि कीटकशास्त्रीय सर्वेक्षण नियमितपणे करण्यात यावे. आरोग्य सहायक / आरोग्य पर्यवेक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांना भेट देऊन क्षेत्रीय पातळीवर आश्रमशाळा भेटी सुरळीतपणे होत आहेत, याची खात्री करावी.

४) आरोग्य संस्थांच्या बाह्यरुग्ण विभागात आश्रमशाळेतील कोणी साथरोग विषयक आजारांसाठी उपचारासाठी (ताप, उलटी, जुलाब, आय एल आय/सारी) आल्यास अशा आश्रमशाळेत आरोग्य पथक पाठवून २४ तासाच्या आत तातडीने त्या आश्रमशाळेची संपूर्ण तपासणी करुन घ्यावी.

५) प्रत्येक तालुका स्तरावर आश्रमशाळा मुख्याध्यापक/ पर्यवेक्षक यांची बैठक घेऊन पावसाळयात मुलांच्या आरोग्याची घ्यावयाची काळजी याबाबत त्यांना अवगत करावे तसेच आरोग्य विषयक अडीअडचणीसाठी कोठे संपर्क साधावा याबाबत माहिती द्यावी.

६) **साप्ताहिक अहवाल** - प्रत्येक तालुका आरोग्य अधिका-याने आपल्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळा विषयक साप्ताहिक अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी यांना सादर करावा. प्रत्येक जिल्हा आरोग्य अधिका-यांनी आपला संकलित साप्ताहिक अहवाल jdhsh@rediffmail.com ssumaharashtra@gmail.com या ई -मेलवर दर सोमवारी दुपारी १२ वाजेपर्यंत पाठवावा. ( सोबत अहवाल प्रपत्र जोडले आहे.)

७) आश्रमशाळा विषयक आरोग्य विषयक बाबीसाठी जिल्हा स्तरावरुन आंतरविभागीय समन्वय ठेवण्यात यावा.

आश्रमशाळेतील प्रत्येक भेटीत पुढील बाबी प्रामुख्याने पाहण्यात याव्यात –

- आय एल आय /सारी / ताप / ताप आणि पुरळ किंवा जलजन्य आजाराने प्रभावित मुलांचे सर्वेक्षण
- ज्या मुलांना इतर अतिजोखमीचे आजार ( जसे – सिकल सेल ऍनिमिया) आहेत त्यांची विशेष काळजी
- आश्रमशाळेची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि नियमित पाणी शुध्दीकरण
- किटकशास्त्रीय सर्वेक्षण , शाळेभोवती डासोत्पत्ती स्थाने असल्यास घ्यावयाची खबरदारी
- खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळया, आवश्यक असल्यास मुलांना मच्छरदाण्यांचे वाटप.
- अन्नसाठा , स्वयंपाक घरातील स्वच्छता इत्यादी.
- शौचालयातील स्वच्छता, हात धुण्यासाठी असणारी व्यवस्था
- आश्रमशाळा कर्मचारी आणि विद्यार्थी यांचे आरोग्य शिक्षण

तरी आपण आपल्या कार्यक्षेत्रात वरील प्रमाणे कार्यवाही करुन आपल्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांमधील मुलांच्या आरोग्याची काळजी योग्य प्रकारे घेतली जाईल, याची दक्षता घ्यावी. आपण या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

( डॉ. नितीन अंबाडेकर),

संचालक, आरोग्य सेवा, पुणे.

**प्रत योग्य कार्यवाहीसाठी –**

उपसंचालक, आरोग्य सेवा, आरोग्य मंडळ, ...... (सर्व)

**प्रत माहितीसाठी सादर –**

मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, रा. आ. अभियान, मुंबई.

मा. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य, मुंबई.

## आश्रमशाळा साप्ताहिक अहवाल

आठवडा - ( सोमवार ते रविवार ) दिनांक --------- ते -----------------

| अ. क्र. | जिल्हा | एकूण आश्रमशाळा | या आठवडयात भेट देण्यात आलेल्या आश्रमशाळा | तपासलेले एकूण विद्यार्थी | आढळलेले एकूण रुग्ण | | | एकूण तपासलेले पाणी नमुने | दूषित पाणी नमुने | कीटक शास्त्रीय सर्वेक्षण केलेल्या आश्रमशाळा | ५ पेक्षा अधिक कंटेनर इंडेक्स असलेल्या आश्रमशाळा | अभिप्राय/ केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | आय एल आय/सारी रुग्ण | ताप आणि पुरळ रुग्ण | उलटी जुलाब रुग्ण | | | | | |
| १ | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | |